सकाळ | eSakal.com
Published on सकाळ (http://www.esakal.com)

# राज्यातील प्रकाशक वळताहेत 'ई-बुक' कडे !

- संतोष धायबर : सकाळ वृत्तसेवा

रविवार, 5 जानेवारी 2014 - 10:02 AM IST

संत सोपानदेवनगरी (सासवड) - सत्तेऐंशिव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये राज्यातील शेकडो प्रकाशकांनी सहभाग घेतला असून, अनेक प्रकाशकांचा कल 'ई-बुक' तयार करण्याबरोबरच स्वतःची संकेतस्थळ तयार करण्याकडे असल्याचे चित्र दिसून येत आहे.

संमेलनामध्ये उपलब्ध असलेल्या विविध विषयांवरील लाखो पुस्तकांना वाचकांचा, विशेषत: तरुण वर्गाचा मोठा प्रतिसाद लाभत आहे. त्यातही, "ई-बुक'संदर्भातील विचारणा होण्याचे प्रमाणही लक्षणीय असल्याचा अनुभव प्रकाशकांना येत आहे. "ई-बुक' खरेदीकडे युवकांचा असलेला कल लक्षात घेत यापुढे मुद्रित पुस्तकांबरोबरच "ई-बुक'ही तयार करण्याचे धोरण अनेक प्रकाशकांनी स्वीकारले आहे. यंदाच्या साहित्य संमेलनामध्येही अनेक प्रकाशकांनी "ई-बुक' उपलब्ध करून दिले आहे.

"बुकगंगा डॉट कॉम'चे मंदार जोगळेकर म्हणाले, ""साहित्याचा जगभर ऑनलाईन प्रसार करण्यासाठी प्रकाशकांना मोफत संकेतस्थळ उपलब्ध करून दिले जाईल. "ई-बुक' तयार करण्याविषयी संमेलनामध्ये अनेक प्रकाशकांनी संपर्क साधला आहे. मुद्रित पुस्तकांबरोबरच "ई-बुक' करण्याकडे प्रकाशकांचा कल आहे. शिक्षणविषयक ऑनलाईन पुस्तकांना जास्त मागणी आहे." कथासंग्रहाबरोबरच धार्मिक आणि क्रीडाविषयक पुस्तकांनाही मागणी असल्याचे निरीक्षण "मॅजिस्टिक'चे अशोक

कोठावळे यांनी नोंदविले; तर लोकप्रिय लेखकांबरोबरच नव्या लेखनालाही वाचक प्रतिसाद देत आहेत, असे "मैत्रेय'चे अरविंद जोशी म्हणाले.

**दृष्टिक्षेपात..**

- विविध प्रकाशकांचा कल ई-बुक व संकेतस्थळ तयार करण्याकडे.
- युवकांकडून ई-बुक खरेदीसाठी मोठी मागणी.
- संमेलनात विविध विषयांची लाखो पुस्तके.
- प्रकाशकांना bookganga.com करून देणार मोफत संकेतस्थळ.
- तंत्रज्ञानातील बदलामुळे वाचकांच्या गरजाही बदलताहेत.

**'सकाळ'च्या शेतीविषयक पुस्तकांना मागणी**

सासवड येथे संमेलन सुरू असल्यामुळे खेड्यापाड्यातील नागरिकही संमेलनामध्ये दाखल झाले आहेत. सकाळ प्रकाशनच्या शेती विषयक पुस्तकांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. याबरोबरच डॉ. सदानंद मोरे यांच्या गर्जा महाराष्ट्राला या पुस्तकालाही मोठी मागणी आहे, असे 'सकाळ' प्रकाशनचे संतोष पाटील यांनी सांगितले.

© eSakal.com, all rights reserved